पत्र क्र.

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांक : २४।०४।२०१७

**: लेखापरीक्षक नामिकेसंदर्भातील सुचना :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ अन्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण, निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेवरील लेखापरीक्षकांकडून करवून घेण्याची तरतुद आहे. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षकांच्या नामिकेसंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 ब आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1961 चे नियम 69(1)(फ) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणांसाठी सन २०१७-२०२० या कालावधीसाठी लेखापरीक्षक नामिका तयार करण्यासाठी www. mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर दिनांक २७ एप्रिल २०१७ ते १२ मे २०१७ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्जासंदर्भातील सविस्तर तपशील वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी सद्यस्थितीत सहकार खात्याच्या लेखापरीक्षक नामिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांनी तसेच नामिकेवर नव्याने येवू इच्छिणाऱ्या लेखापरीक्षकांनी उक्त निर्धारीत मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

संपर्क :

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७, Email: comm_audit@rediffmail.com


---

जा.क्र.सआ/लेप/लेखापरीक्षक नामतालिका/६२३ / सन 2017, दिनांक२४एप्रिल 2017

## : परिपत्रक :

**विषय : सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी नामतालिका तयार करणेबाबत ...**

**संदर्भ** : 1. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81.
2. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 69.
3. या कार्यालयाचा आदेश क्र. सआ/अनिलेप/नामतालिका/आदेश/कक्ष-18/976/2014, दिनांक 28.10.2014.
4. महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक सगृयो-2017,स-14/प्र.क्र.55/389, दिनांक 20 जानेवारी 2017.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाची तरतुद आहे. अधिनियमान्वये सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणास्तव लेखापरीक्षक नेमणूकीची स्वयत्तता संस्थेच्या वार्षिक साधारण सभेस प्रदान करण्यात आलेली आहे. संस्थेने निबंधकांनी तयार केलेल्या व राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करवून घ्यावयाचे आहे. या नामतालिकेमध्ये सनदी लेखापाल, सनदी लेखापालांच्या फर्मस, परिव्यय लेखापाल व त्यांच्या फर्मस, प्रमाणित लेखापरीक्षक व शासकीय लेखापरीक्षक यांचा अंर्तभाव आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 व नियम 69 अन्वये संदर्भ क्र. 3 प्रमाणे या कार्यालयाचे आदेशान्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका यापूर्वी सन 2014 मध्ये प्रसिध्द करणेत आलेली आहे. ही नामतालिका www.mahasahakar.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या नामतालिकेचा कालावधी संपूष्टात येणेपूर्वी संदर्भ क्र. 4 अन्वयेच्या शासन निर्णयाप्रमाणे पुढील 2 आर्थकि वर्षांसाठीची नामतालिका तयार करणे प्रस्तावित आहे. सदरहू पारित शासन निर्णयाप्रमाणे लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी एकसुत्रता राखणेस्तव मार्गदर्शक सूचना प्रसारित करणे आवश्यक झाले असल्याने, नामतालिका तयार करणेसाठीच्या सुचना पुढीलप्रमाणे आहेत.

नवीन लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी दिनांक 27 एप्रिल 2017 ते 12 मे 2017 या कालावधीमध्ये इच्छुकांकडून ऑनलाईन अर्ज मागवावयाचे आहेत. लेखापरीक्षक नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठी सद्यस्थितीत नामतालिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांची नोंदणी यापुढे देखील कायम राहणेस्तव इच्छुक असलेले व नव्याने अर्हता धारण करणारे इच्छुक लेखापरीक्षक याप्रमाणे दोन्ही प्रकारांपैकी लागुप्रकारामध्ये संबंधीतांस अर्ज करता येतील. याप्रमाणे नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठी

प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी नियोजनबध्द व काटेकोरपणे होणेसाठी पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

**१. नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज मागणी, छाननी यासंदर्भातील कृती कार्यक्रम :**

| अ.क्र. | कामकाजाचे स्वरुप | कालावधी | | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| 1 | नामतालिका तयार करणेबाबतची सुचना प्रसिध्द करणे. (ऑनलाईन पध्दतीने वेबसाईटवर, राज्यस्तरीय वर्तमानपत्रात, कार्यालयांचे नोटीस बोर्ड इत्यादी.) | २७ एप्रिल २०१७ | | १ |
| 2 | नवीन नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याचा कालावधी | २७ एप्रिल २०१७ | १२ मे २०१७ | १५ |
| 3 | नवीन नामतालिकेसाठी सादर झालेले ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे यांची छाननी जिल्हा स्तरावरील समितीने करणे. | १३ मे २०१७ | २९ मे २०१७ | १५ |
| 4 | जिल्हा स्तरीय समितीने छाननी केलेल्या ऑनलाईन अर्जाची व पात्रतेसंदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी सहकार आयुक्त स्तरावर करणे. | १६ मे २०१७ | ३१ मे २०१७ | १६ |
| 5 | अस्विकृत अर्जाबाबत संबंधीतांना ई-मेल/एसएमएस पाठविणे, व अस्विकृत अर्जापैकी ज्या अर्जाचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागीतलेली आहे, त्यासंदर्भातील तक्रार निवारण समिती स्तरावरील छाननी कामकाज. | १ जून २०१७ | ७ जून २०१७ | ७ |
| 6 | अस्विकृत अर्जाचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागीतलेल्या अर्जापैकी समितीने स्विकृत करणेसाठी शिफारस केलेल्या अर्जा संदर्भातील छाननी कामकाज करणे. (जिल्हा समिती स्तरावर व त्यानंतर मुख्यालय) | ८ जून २०१७ | १५ जून २०१७ | ७ |
| 7 | पात्र लेखापरीक्षकांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | १९ जून २०१७ | | १ |

२. नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाची छाननी व तदनुषंगाने समन्वय करणेसाठी नियम 69 (फ) (तीन) प्रमाणे जिल्हा उपनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा छाननी समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचेसह सनदी लेखापाल, परिव्यय लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक यांच्या प्रतिनिधीचा समावेश, मान्यताप्राप्त संघटनेकडून/संस्थेकडून नावे प्राप्त करुन करावयाचा आहे. याप्रमाणे गठीत जिल्हा स्तरीय समितीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सदरचे कामकाज संबंधित जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी जिल्हा स्तरावर करावयाचे आहे.

३. तसेच नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाच्या छाननीमध्ये अस्विकृत केलेल्या व्यथित अर्जादारांना दाद मागण्यासाठी व तदनुषंगाने समन्वय करणेसाठी नियम 69 (फ)(पाच) प्रमाणे विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली विभागनिहाय तक्रार निवारण समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये विभागीय सहनिबंधक हे सदस्य म्हणून आणि विभागीय उपनिबंधक समितीचे सदस्य सचिव म्हणून काम करतील. या समितीचा निर्णय अंतिम असेल.

### ४. जिल्हा स्तरीय छाननी समितीने करावयाचे कामकाज :

1. लेखापरीक्षक नामतालिकेसाठी जाहिरातीनुसार सहकार विभागाच्या www.mahasahakar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आलेल्या अर्जाची नोंद ठेवली पाहिजे. त्यामध्ये नोंदलेल्या अर्जानुसार सदर अर्ज स्विकारला किंवा नाकारला याबाबतच्या नोंदी कराव्यात.
2. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची, मुद्दा क्र. 7 मध्ये नमुद केलेल्या छाननी निकषानुसार छाननी करणे, तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन अर्ज अंतिम करणे.
3. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची छाननी दिनांक 13 मे 2017 पासून करावयाची असून सोबतच्या कृती कार्यक्रमानुसार दिलेल्या दिनांक 29 मे 2017 या अंतिम दिनांकापर्यंत प्रतिदिन नियमित स्वरुपात पूर्ण करावयाची आहे.
4. ऑनलाईन अर्जांची छाननी पूर्ण झाल्यानंतर सदर अर्ज सोबतच्या कृती कार्यक्रमानुसार पुढील कार्यवाहीसाठी प्रतिदिनी नियमितपणे सहकार आयुक्त कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावेत.
5. जे अर्ज निकषात बसत नसतील ते अस्विकृत करुन त्याचे कारण नमुद करावे. उदाहरणार्थ.
   १. शैक्षणिक पात्रेसंदर्भातील कागदपत्रे अपलोड न करणे अथवा ती सुस्पष्ट नसणे.
   २. स्वयंघोषीत शपथपत्र अपलोड न करणे.
   ३. निर्धारीत साईज मधील फोटो अपलोड न करणे.
   ४. पॅन कार्ड झेरॉक्स/स्कॅन/फोटो कॉपी अपलोड न करणे.
   ५. फर्म तसेच वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापालांनी Constitution Certificate अपलोड न करणे.
   6. वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल आणि प्रमाणित लेखापरीक्षकांनी सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा त्याअनुषंगीक कागदपत्रके अपलोड न करणे किंवा ती सुस्पष्ट नसणे.
6. ऑनलाईन अर्जाचे छाननीनंतर नामतालिकेवरील समावेशासाठी शिफारसीनुसार पात्र/अपात्र **अर्जदारांची यादी** समिती सदस्यांनी सही करुन सहकार आयुक्त कार्यालयाकडे हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीद्वारे सादर करावी.
7. **लेखापरीक्षक नामतालिकेसाठी प्राप्त ऑनलाईन अर्जाची छाननी करावयाचे निकष :**
   १. ऑनलाईन प्रक्रियेद्वारा प्राप्त झालेला अर्ज, अर्ज भरण्याच्या सूचनांच्या अनुषंगाने परिपूर्ण असल्याची खात्री करावी. उदा. शैक्षणिक पात्रता, लेखापरीक्षण अनुभव, फोटो, शपथपत्र, पत्ता. तसेच संबंधीत अर्जदरांनी अपलोड केलेले सर्व दस्त अर्जातील नमुद माहितीशी मिळते-जुळते आहेत किंवा कसे याची खात्री करणे आवश्यक आहे.
   २. अर्जदाराने अर्जातील तपशील भरताना, कलम ८१ व नियम ६९ मधील तरतुदीनुसार नामतालिकेकरीता अर्हताधारक लेखापरीक्षक, त्यासाठीचा अनुभव, पात्रता आणि त्याकरीता या सोबतचे परिशिष्टात निर्देशित केलेल्या अटींचे पूर्णत: पालन करुन संपूर्ण तपशील भरलेला आहे किंवा नाही, याची खात्री करावी.
   ३. प्राप्त अर्जापैकी नामतालिकेवरील समावेशासाठी पात्र अर्जांच्या बाबतीत लेखापरीक्षकांची 'अ ', 'ब', 'क' या वर्गवारीत अ १, अ २, ब १, ब २ आणि क अशी वर्गवारी करावयाची असून त्याप्रमाणे नामतालिकेवरील समावेशासाठी त्यांची शिफारस करावी.
   ४. **सनदी/परिव्यय लेखापाल यांच्या फर्मस :**
      i. सनदी/परिव्यय लेखापाल यांच्या फर्मसाठी सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणच्या किमान अनुभवाची अट नाही.
      ii. लेखापरीक्षकांची वर्गवारी निश्चित करताना - सनदी/परिव्यय लेखापाल यांच्या फर्मसचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ १** या उपवर्गात करावा.

iii. सनदी/परिव्यय लेखापाल यांच्या फर्मच्या बाबतीत फर्मच्या सर्व भागीदारांचा तपशील अर्जामध्ये नमुद केलेला आहे किंवा नाही याची पडताळणी ICAI ने संबंधीतांस दिलेल्या Constitution Certificate वरुन करावी.

iv. फर्मच्या भागीदारांनी नामतालिकेसाठी स्वतंत्रपणाने किंवा इतर भागीदारी फर्मसच्या माध्यमातुन नामतालिकेवरील समावेशासाठी अर्ज केलेला नाही याचे शपथपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.

v. फर्मच्या सर्व भागीदारांनी मेंबरशिप नंबर नमुद करणे तसेच शपथपत्रावर सह्या करणे आवश्यक आहे.

vi. अर्जासोबत सनदी/परिव्यय लेखापाल यांच्या फर्मसचे Constitution Certificate (स्टेटस् रिपोर्ट), तसेच भागीदारांचे सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) च्या मुळ प्रती अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

vii. फर्मच्या सर्व भागीदारांचे फोटो व पॅन कार्डची अपलोड केलेली स्कॅन/फोटो/झेरॉक्स कॉपी सुस्पष्ट असावी.

viii. सनदी/परिव्यय लेखापालाच्या भागीदारी फर्मचे तसेच वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक यांची नोंदणीकृत कार्यालये महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे.

## ५. सनदी/परिव्यय लेखापाल :

i. नामतालिकेसाठी सनदी/परिव्यय लेखापाल यांना फर्मद्वारे किंवा वैयक्तीरित्या यापैकी कोणत्याही एकाच कक्षेत अर्ज करता येईल.

ii. नामतालिकेसाठी जर एखाद्या सनदी/परिव्यय लेखापालांनी फर्मव्दारे व वैयक्तीकरित्या असे स्वतंत्र अर्ज केले असल्यास दोन्ही अर्ज अस्विकृत केले जातील.

iii. अर्जासोबत सनदी/परिव्यय लेखापाल यांनी सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) तसेच Conctitution Certificate (स्टेटस् रिपोर्ट) यांच्या स्वस्वाक्षरीत प्रती अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

iv. सनदी/परिव्यय लेखापाल यांची लेखापरीक्षक वर्गवारी निश्‍चित करताना - ज्या वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल यांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा **किमान ५ व त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव** आहे, अशा वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ १** या उपवर्गात करावा.

v. तर ज्या वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल यांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा **किमान १ वर्षांचा परंतू ५ वर्षांपेक्षा कमी अनुभव आहे**, अशा वैयक्तीक सनदी/परिव्यय लेखापाल यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब १** या उपवर्गात करावा.

## ६. प्रमाणित लेखापरीक्षक :

i. प्रमाणित लेखापरीक्षकांसाठी **पदवी धारण करणे ही अट अनिवार्य आहे,** जे प्रमाणित लेखापरीक्षक अर्जदार **पदवीधारक नसतील त्यांना नामतालिकेसाठी पात्र धरण्यात येऊ नये.**

ii. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा किमान १० व त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव आहे, अशा प्रमाणित लेखापरीक्षकांचा यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब २** या उपवर्गात करावा.

iii. ज्या प्रमाणित लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा किमान ३ वर्षांचा परंतू १० वर्षापेक्षा कमी वर्षांचा अनुभव आहे, अशा प्रमाणित लेखापरीक्षकांचा यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **क** वर्गात करावा.

iv. प्रमाणित लेखापरीक्षक सहकार खात्यातुन निवृत्त झालेले असल्यास, ते ज्या कार्यालयातुन निवृत्त झालेले आहेत त्या कार्यालयाचा अनुभवाचा दाखला, त्यांनी अपलोड केल्याची खात्री करावी.

v. सेवानिवृत्त कर्मचारी यांनी प्रमाणित लेखापरीक्षकासाठी निर्धारीत करुन दिलेल्या अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

vi. अर्जासोबत प्रमाणित लेखापरीक्षक यांनी पदवी प्रमाणपत्र व जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षा उत्तिर्ण झालेबाबतच्या प्रमाणपत्राच्या मुळ प्रती अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

vii. नामतालिकेसाठी लेखापरीक्षकांस एकच अर्ज करता येईल. जर एखाद्या लेखापरीक्षकने दोन स्वतंत्र अर्ज केले असल्यास दोन्ही अर्ज अस्विकृत केले जातील.

**७. शासकीय लेखापरीक्षक :**

i. सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ १** या उपवर्गात करावा.

ii. विशेष लेखापरीक्षक वर्ग १ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या अ वर्गापैकी **अ २** या उपवर्गात करावा.

iii. विशेष लेखापरीक्षक वर्ग २ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब १** या उपवर्गात करावा.

iv. लेखापरीक्षक श्रेणी १ यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या ब वर्गापैकी **ब २** या उपवर्गात करावा.

v. लेखापरीक्षक श्रोणी २ व उपलेखापरीक्षक यांचा समावेश लेखापरीक्षकांच्या **क** वर्गात करावा.

vi. शासकीय लेखापरीक्षकांच्या बाबतीत लेखापरीक्षकांनी H.D.C.M., DCBM किंवा G.D.C. & A. यापैकी एक परिक्षा उत्तीर्ण असल्याची खात्री करण्यात यावी.

vii. शासकीय लेखापरीक्षकांच्या बाबतीत सहकार व्यवस्थपनातील उच्च पदविका (H.D.C.M.), सहकारी लेखापरीक्षण या मधील पदविका (D.C.A.), सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका (G.D.C. & A.) यापैकी एक परिक्षा उत्तीर्ण असल्याची खात्री करावी.

viii. त्याचप्रमाणे सरळसेवा भरतीने जे शासकीय लेखापरीक्षक सेवेत दाखल झालेले असतील त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केलेला असल्याचा तसेच त्यांना शासकीय सेवेतुन कमी करणेबाबतचा शासनाचा कोणताही प्रस्ताव नसल्याबाबत संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आदेशाची/प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडल्याची खात्री करावी.

**८. स्वयंघोषीत शपथपत्र :**

i. स्वयंघोषीत शपथपत्र हे साध्या कागदावर विहित नमुन्यात व मुळ प्रतीत स्कॅन करुन अपलोड केलेले असावे.

**ii.** सर्व लेखापरीक्षकांना सहकारी संस्थांचे उचित ज्ञान व मराठीचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक असलेने त्यांनी याबाबत स्वयंघोषीत शपथपत्रामध्ये महाराष्ट्रात किमान ३ वर्ष वास्तव्य असुन मराठीचे ज्ञान असल्याचे घोषीत करणे आवश्यक आहे.

**iii.** भागीदारी फर्मच्या किमान २ भागीदारांचे महाराष्ट्रात किमान ३ वर्ष वास्तव्य आहे व त्यांना मराठीचे ज्ञान आहे असे स्वयंघोषीत शपथपत्र, फर्मच्या वतीने एका भागीदाराने करुन देणे आवश्यक आहे.

**iv.** स्वयंघोषणापत्रात सहकारी संस्थांच्या अनुभवासंदर्भातील तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

**v.** स्वयंघोषणापत्रात सनदी/परिव्यय लेखापालांच्या फर्मच्या बाबतीत तिचे भागीदार हे व्यक्तीगत किंवा इतर फर्ममध्ये भागीदार असणार नाहीत, त्याचप्रमाणे सदरहू माहिती सत्य असून त्यामध्ये काही खोटे आढळल्यास होणाऱ्या परिणामास व कारवाईस पात्र राहीन याबाबतचा तपशील नमुद करणे आवश्यक आहे.

**९. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभव :**

**i.** सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षाच्या अनुभवा संदर्भात सनदी/परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्मस यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र विचारात घेतले जाईल.

**ii.** सनदी/परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्मस राज्य शासनाच्या सहकार विभागाच्या नामतालिकेवर नसतील तर त्यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

**iii.** नामतालिकेवरील **समावेशासाठी** अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव ग्राह्य धरावा, त्यासाठी सनदी/परिव्यय लेखापाल अथवा त्यांच्या फर्मस यांनी दिलेले अंतर्गत लेखापरीक्षणासाठीचे अनुभव प्रमाणपत्र विचारात घ्यावे.

iv. ज्या सनदी/परिव्यय लेखापालांना सहकारी संस्थांच्या नियमित वैधानिक लेखापरीक्षणाचा अनुभव पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा आहे, त्यांचा समावेश अ १ वर्गवारीमध्ये करावा. परंतू एखाद्या सनदी/परिव्यय लेखापालास पाच वर्षांचा केवळ अंतर्गत लेखापरीक्षणाचा अनुभव असेल तर त्यांचा समावेश अ १ वर्गवारीमध्ये करु नये, त्यांचा समावेश ब १ मध्ये करावा.

v. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासाठी सनदी/परिव्यय लेखापालांचे बाबतीत सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) प्राप्त झाल्यानंतर आणि प्रमाणित लेखापरीक्षकांच्या बाबतीत जी.डी. सी. ॲण्ड ए. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना सहकारी संस्थांचे अंतर्गत लेखापरीक्षण, वैधानिक/वार्षिक, चाचणी, फेरलेखापरीक्षण, परिव्यय व मुल्य (Performance) लेखापरीक्षणाचा अनुभव किती वर्षाचा आहे, यासाठी त्यांनी साध्या पेपरवर शपथपत्र भरून देणे आवश्यक आहे.

१०. शासकीय लेखापरीक्षक वगळता इतर सर्व लेखापरीक्षकांनी ते एखाद्या संस्थेत अंतर्गत वा सतत व समवर्ती लेखापरीक्षण करीत असल्यास ते त्या संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून काम स्विकारणार नाही असे संमती पत्र अर्जासोबत देणे आवश्यक आहे.

११. सर्व लेखापरिक्षकांच्या बाबतीत त्यांनी त्या संस्थेकडून रु.१०,०००/- पेक्षा अधिक कर्ज घेतलेले असल्यास किंवा ते एखाद्या संस्थेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी असल्यास अशा संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण स्विकारणार नाही असे संमती पत्र लेखापरीक्षकांनी अर्जासोबत देणे आवश्यक आहे.

१२. सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुभवासंदर्भात लेखापरीक्षकांनी संबंधीत निबंधक/ जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचेकडे लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याची पोहोच किंवा तसे प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. शिवाय संस्थेने लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केलेल्या ठरावांच्या प्रती, कलम ७९ अन्वये लेखापरीक्षकांच्या नेमणूकी अनुषंगाने दाखल केलेल विवरण पत्र वउ तदुषंगाने दाखल केलेले लेखापरीक्षण अहवाल विचारात घ्यावे.

१३. दिनांक २८.१०.२०१४ रोजी व तदनंतर प्रसिध्द केलेल्या व परिपत्रकीय दिनांकारोजी कार्यरत असलेल्या नामतालिकेवरील ज्या सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षक यांना त्यांचे कर्तव्यातील कसुर व अन्य कारणांने नामतालिकेवरुन कमी केलेले आहे त्यांचा नव्याने प्रस्तावित नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठी विचार करणेत येवू नये.

१४. प्राप्त अर्जांची, जिल्हा स्तरीय समितीने निर्धारीत करुन दिलेल्या कागदपत्रांसह संपूर्णपणे पूर्तता झालेली असून त्याप्रमाणे विहित छाननी परिपूर्णरित्या करण्यात आलेली आहे ही बाब सर्व समिती सदस्यांनी प्रमाणित करुन तसे या कार्यालयास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५. तक्रार निवारण समितीने करावयाचे कामकाज :**

नामतालिकेसाठी आलेल्या ऑनलाईन अर्जाच्या छाननीमध्ये अस्विकृत केलेल्या व्यथित अर्जदारांना दाद मागण्यासाठी व तदनुषंगाने समन्वय करणेसाठी नियम 69 (फ)(पाच) प्रमाणे विभागीय सहनिबंधक यांचे अध्यक्षतेखाली विभागनिहाय तक्रार निवारण समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांमध्ये विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) हे सदस्य म्हणून आणि विभागीय उपनिबंधक समितीचे सदस्य सचिव म्हणून काम करतील. सदर समितीचा निर्णय अंतिम असेल. सदर समित्यांना पुढीलप्रमाणे कामकाज करणे अभिप्रेत आहे.

1. जिल्हा समितीने अस्विकृत केलेल्या अर्जांपैकी ज्या बाधित अर्जदारांनी तक्रार निवराण समितीकडे दाद मागीतलेली आहे, अशा आलेल्या अर्जाची नोंद ठेवावी.
2. आलेल्या अर्जाची सोबत जोडलेल्या निकषानुसार जिल्हा समितीने ऑनलाईन अर्जाची छाननी केलेली आहे किंवा कसे? याची तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या आधारे अर्जादारांने तक्रार अर्जासमवेत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन पडताळणी करून अर्ज अंतिम करणे.
3. प्राप्त तक्रारी अर्जाबाबत ठेवलेल्या नोंदवहीत नोंदलेल्या तपशीलानुसार संबंधीतांचा ऑनलाईन अर्ज स्विकारला किंवा नाकारला याबाबतच्या नोंदी कराव्यात.
4. तक्रार अर्जाप्रमाणे ऑनलाईन अर्जाचे छाननीनंतर नामतालिकेवरील समावेशासाठी शिफारसीनुसार पात्र/अपात्र अर्जदारांची यादी समिती सदस्यांनी सही करुन सहकार आयुक्त कार्यालयाकडे हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीने सादर करावी.

**६. लेखापरीक्षकांचे वर्गीकरण हे लेखापरीक्षकांचा प्रकार, शैक्षणिक पात्रता, लेखापरीक्षणाचा अनुभव याबाबी विचारात घेवून लेखापरीक्षकांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करावे.**

| लेखापरीक्षक वर्ग | लेखापरीक्षक उपवर्ग | लेखापरीक्षकांचा प्रकार | संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असणे व मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे या व्यतिरिक्त आवश्यक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| अ | अ 1 | सनदी /परिव्यव लेखापाल फर्म | 2 किंवा 2 पेक्षा जास्त लेखापालांची फर्म लेखापरीक्षण अनुभवाची आवश्यकता नाही. |
| | अ 1 | सनदी /परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान 5 किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांचा अनुभव असणारे सनदी/ परिव्यय लेखापाल. |
| | अ 1 | सहनिबंधक | शासनाचे सहकार खात्यातील सहनिबंधक (लेखापरीक्षण) |
| | अ 2 | विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 |
| ब | ब 1 | सनदी /परिव्यय लेखापाल | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणचा किमान 1 वर्षाचा परंतू 5 वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे सनदी/परिव्यय लेखापाल. |
| | ब 1 | विशेष लेखापरीक्षक वर्ग 2 | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील विशेष लेखापरीक्षक वर्ग 2 |
| | ब 2 | लेखापरीक्षक श्रेणी 1 | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक श्रेणी 1 |
| | ब 2 | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि ज्यांना संस्थांच्या लेखापरीक्षण करण्याचा किमान 10 अथवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |
| क | क | प्रमाणित लेखापरीक्षक | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेले व सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केलेले आणि ज्यांना संस्थांच्या लेखापरीक्षण करण्याचा किमान 3 वर्षाचा परंतू 10 वर्षापेक्षा कमी अनुभव असणारे प्रमाणित लेखापरीक्षक. |
| | क | लेखापरीक्षक श्रेणी 2 उपलेखापरीक्षक | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेले शासनाचे सहकार खात्यातील लेखापरीक्षक श्रेणी 2 व उपलेखापरीक्षक |

७. वरीलप्रमाणे कार्यवाही वेळेची मर्यादा पाळून पूर्ण करणे आवश्यक आहे.

८. संपूर्ण राज्यासाठी व सर्व प्रकारच्या संस्थांसाठी लेखापरीक्षकांची नामतालिका संयुक्त अशी सहकार आयुक्त कार्यालयाव्दारे तयार करण्यात येईल.

९. लेखापरीक्षक नामतालिकेसंदर्भातील सहकार अधिनियमातील तरतुदी व लेखापरीक्षक व संस्थांचे सुधारित वर्गीकरण तक्ता - परिशीष्ट क्र.1, लेखापरीक्षकांच्या नामतालिकेवरील समावेशासाठी ऑनलाईन अर्ज करु शकणारे लेखापरीक्षकांचा तपशील -परिशीष्ट क्र.2,लेखापरीक्षक नामतालिकेवर येण्यासाठी मराठी भाषा, शैक्षणिक अर्हता व अनुभव या संदर्भातील साध्या कागदावरील प्रतिज्ञापत्र -परिशिष्ठ क्र. 3 व ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी सविस्तर सूचना - परिशीष्ट क्र. 4 सोबत जोडले आहे.

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे.**

**प्रत माहितीस्तव :**

१) मा. सचिव (सहकार) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचनालय, नागपूर
४) संचालक , (पणन) महाराष्ट्र राज्य ,पुणे
५) अपर आयुक्त व विशेष निबंधक
६) अपर निबंधक, सहकारी संस्था (वसुली व नियोजन/तपासणी व निवडणूक / प्रशासन)
७) विशेष कार्य अधिकारी तथा अतिरीक्त निबंधक, पदुम लेखापरीक्षामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी :**

१) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (सर्व) विभाग.
२) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(लेखापरीक्षण), सर्व.
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ , सहकारी संस्था, सर्व.

परिशिष्ट क्र. 1

## लेखापरीक्षक नामतालिकेसंदर्भातील अधिनियमातील तरतुद :

**Section 81. - Audit**

( 1) (a) The society shall cause to be audited its accounts at least once in each financial year and also cause it to be completed within a period of four months from the close of financial year to which such accounts relate by auditor or auditing firm from a panel prepared by the Registrar and approved by the State Government or an authority authorized by it in this behalf, possessing required qualifications and experience as may be prescribed to be eligible for auditing accounts of societies, appointed by the general body of a society, as provided in sub-section (2A) of section 75 and shall lay such audit report before the annual general body meeting. In case of apex society, the audit report shall also be laid before both Houses of the State Legislature, in such manner, as may be prescribed:

Provided that, if the Registrar is satisfied that the society has failed to intimate and file the return as provided by sub-section (2A) of section 75 and subsection (1B) of section 79, by order, for the reasons to be recorded in writirg, he may cause its accounts to be audited, by an auditor from the panel of the auditors approved by the State Government or an authority authorized by it in this behalf:

Provided further that, no auditor shall accept audit of more than twenty societies for audit in a financial year excluding societies having paid up share capital of less than rupees one lakh:

Provided also that, the Registrar shall maintain a panel of auditors and auditing firms as approved by the State Government or an authority authorized by it in this behalf;

(b) The manner of preparation, declaration and maintenance of the panel of auditors and auditing firms by the Registrar shall be such as may be prescribed;

(c) The committee of every society shall ensure that the annual financial statements like the receipts and payments or income and expenditure, profit and loss and the balance-sheet along with such schedules and other statements are audited, within four months of the closure of the financial years;

(d) The Registrar shall submit the audit report of every apex co-operative society to the State Government annually for being laid before the both Houses of the State Legislature in the manner prescribed;

(e) The auditor's report shall have,-

(i) all particulars of the defects or the irregularities observed in audit and in case of financial irregularities and misappropriation or embezzlement of funds or fraud, the auditor or the auditing firm shall investigate and report the modus operandi, the entrustment, amount involved

(ii) accounting irregularities and their implications on the financial statements to be indicated in detail in the report with the corresponding effects on the profit and loss;

(iii) the functioning of the committee and subcommittees of the societies be checked and if any irregularities or violation are observed or reported, duly fixing the responsibilities for such irregularities or violations;

(f) The remuneration of the auditor or auditing firm of a society shall be borne by the society and shall be at such rate as may be prescribed

(g) The Registrar shall maintain the list of societies district-wise, the list of working societies, the list of societies whose accounts are audited, the list of societies whose accounts are not audited within the prescribed time and reasons therefor. The Registrar shall co-ordinate with the societies and the auditors or auditing firms and ensure the completion of audit of accounts of all the co-operative societies in time every year.

Explanation-I.- For the purposes of this section, the expression, "possessing required qualifications" for being included in the panel duly approved by the State Government or an authority authorized by the State Government in this behalf, from time to time shall, mean and include –

(a) a person who is a Chartered Accountant within the meaning of the Chartered Accountants Act, 1949, who has a fair knowledge of the functioning of the Societies and an experience of at least one year in auditing of societies with a working knowledge of Marathi language;

(b) an auditing firm which is a firm of more than one Chartered Accountant within the meaning of the Chartered Accountants Act, 1949, who have a fair knowledge of the functioning of the societies with a working knowledge of Marathi language;

(b-1) a person who is a Cost Accountant within the meaning of the Cost and Works Accountants Act, 1959, who has a fair knowledge of the functioning of the Societies and an experience of at least one year in auditing of societies with a working knowledge of Marathi language;

(b-2) an auditing firm, which is a firm of more than one Cost Accountant within the meaning of the Cost and Works Accountants Act, 1959, having a fair knowledge of the functioning of the societies with a working knowledge of Marathi language;

(c) a certified auditor who is a person holding a Degree from recognized University and also has completed a Government Diploma in Co-operation and Accountancy and having a fair knowledge of the functioning of the societies and who has an experience of at least three years in auditing of societies with a working knowledge of Marathi language;

(d) a Government Auditor who is an employee of the Co-operation Department of the State, possessing the Higher Diploma in Co-operative Management or the Diploma in Co-operative Audit or Government Diploma in Co-operation and Accountancy with a working knowledge of Marathi language and who has completed the period of probation successfully;

Explanation II.- The terms and conditions for inclusion and retention of name as an auditor or auditing firm in the panel of auditors shall be subject to the terms and conditions, as may be prescribed.

## 69. Procedure for appointment of auditor and conducting audit.

(1) (a) The audit of accounts of the societies shall be conducted by the auditor or auditing firm appointed by the society in its annual general body meeting within the period specified in the Act, from the panel of auditing firms or auditors whose names are listed as on the date of annual general body meeting and is approved by the State Government or authority authorized in this behalf.

Explanation - For the purpose of this rule, Audit shall include annual, test, cost or perforrnance, special and re-audit.

(b) Audit of the society shall be completed within four months from the close of the financial year and the report, also in Compact Disc shall be submitted to the society and the Registrar as specified in subsection(5B) of section 81 of the Act, and also Part A of audit report, audit certificate and audited financial statements shall be uploaded by auditor on official website of Co-operation Department ;

Provided that, Apex societies shall submit copies of audit report as specified by the Registrar to be laid before the State Legislature.

(c) Every apex society shall submit to the Registrar, required copies of audit memorandum in both Marathi and English, in print and compact disk form within sixty days from receipt of audit memorandum from the auditor of the society for each financial year. The Registrar shall submit these copies of audit memorandum received from such society to the State Government to be laid before the State Legislature:

Provided that, if any apex society fails to submit required copies of audit memorandum as mentioned in clause (c) of this sub-rule in due time, the said society shall submit reasons thereof in writing to the Registrar. The Registrar shall submit reasons in writing received from the said society to the State Government to be laid before the State Legislature.

(d) Before appointing the auditor or the auditing firm, the society shall ensure that, the auditor or the auditing firm proposed to be appointed for conducting its audit has not accepted the societies for audit exceeding the limit prescribed under the Act.

(e) Qualifications and experience of the auditor shall be as specified in Explanation-I to sub-section ( 1 ) of section 81.

(f) The Registrar shall prepare, declare and maintain the panel of auditors and auditing firms from time to time in the following manner,-

(i) the Registrar shall call applications before the specified date as declared in the notice for empanelment from eligible auditors and auditing firms by a public notice to be displayed on the official website of the State Government and in any other mode, if required. Such notice shall also be published on the notice board of the office of the Registrar and District Deputy Registrars.

(ii) Every applicant shall submit only one application to the office of the concerned District Deputy Registrar of the District, where he ordinarily resides.

